वैध मापन शास्त्र यंत्रणेच्या संगणकीकरणासाठी माहे मार्च-२०२४ ते मार्च-२०२५ पर्यंत क्लॉऊड (Storage) सर्व्हिस मे. महाआयटी यांचेकडून उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : वैमाशा-२०२६ /प्र.क्र.१२१/ग्रा.सं.-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०२६

वाचा :- नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांचे पत्र क्र. वैमाशा-५/लेखा/ महाआयटी/प्र.मं./२०२६/७७६, दि. २४ सप्टेंबर, २०२६

शासन निर्णय :-

वैध मापन शास्त्र यंत्रणेच्या संगणकीकरणासाठी सन २०२४ -२०२५ पर्यंत क्लॉऊड (Storage) सर्व्हिस उपलब्ध करुन देण्यासाठी मे. महाआयटी यांचेकडून रु, १,६८,८६,००५ /-(अक्षरी रुपये एक कोटी अडुसष्ट लाख शहाऐंशी हजार पाच फक्त) इतक्या रक्कमेचे टॅक्स इन्व्हॉईस दिनांक २४ सप्टेंबर, २०२६ च्या पत्रान्वये प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदर रक्कम महाआयटी यांना अदा करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी शासनास केली आहे.

वैध मापन शास्त्र यंत्रणेच्या संगणकीकरणासाठी २०२४ ते २०२५ पर्यंत क्लॉऊड (Storage) सर्व्हिस उपलब्ध करुन देण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे रु, १,६८,८६,००५ /-(अक्षरी रुपये एक कोटी अडुसष्ट लाख शहाऐंशी हजार पाच फक्त) इतक्या खर्चाच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

Sr.No	Description	SAC/HSN	Qty	Rate / Month	Total Amount
1	Development sevice Vaidhmapan Software Maintenance and Support (KEONICS) @ 12 Months (FY 2024-25)	998513	1.00	रु.1,31,28,600.00	रु.1,31,28,600.00
2	MahaIT Charges @ 9%	98315	1.00	रु 11,81,574.00	रु 11,81,574.00
3	**BASIC AMOUNT**				रु.1,43,10,174.00
4		SGST@9.0%			रु 1,287,915.66
5		CGST @9.0%			रु 1,287,915.66
6	Total (In words): Indian Rupee One Crore Sixty-Eighty-Six Thousand Five only				रु.1,68,86.005.00

२. सदर खर्च मागणी क्र.एम-३, मुख्य लेखाशिर्ष ३४७५- इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा, १०६- वजने व मापे यांचे विनियमन, (००) (०१) वजने व मापे विनियमन- (अनिवार्य) (३४७५००९३), १७- संगणक खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र २०२६/प्र.क्र.२२, विनियम, दिनांक ११ ऑगस्ट, २०२६ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग- दोन, अ.क्र. ३७ -अ, नियम क्र. ७६ अन्वये प्रशासकीय विभागास दिलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०२९१७१६०९८००६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.10.29 17:19:30 +05'30'

(पूजा मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
३. महालेखापाल-१, (लेखा व परीक्षा), मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. वित्तीय सल्लागार व उप सचिव, याना आवश्यक ती कार्यवाहीसाठी अग्रेषित.
७. संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान संचालनालय, एपीजे हाऊस, ३ रा मजला, के.सी.कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
८. निवडनस्ती, (ग्रा.सं.-३).